टाय ब्रेकरमध्ये पुणेरी पलटनने मारली बाजी! दबंग दिल्लीवर ६-५ ने मिळवला विजय

दिल्ली,१२ ऑक्टोबर २०२५: प्रो कबड्डी लीग २०२५ स्पर्धेतील ७९ वा सामना पुणेरी पलटन आणि दबंग दिल्ली या दोन्ही संघांमध्ये पार पडला. गेल्यावेळी हे दोन्ही संघ आमनेसामने आले होते त्यावेळी गोल्डन रेडने निकाल लागला होता. या सामन्याचा निकाल हा टायब्रेकरने लागला. सामना ३८-३८ ने बरोबरीत सुटल्यानंतर टाय ब्रेकरमध्ये पुणेरी पलटनने ६-५ ने बाजी मारली.

या सामन्यात पुणेरी पलटनकडून पहिली चढाई करण्यासाठी अस्लम इनामदार चढाईला आला. पण पहिल्याच चढाईत त्याची पकड झाली. यासह दबंग दिल्लीने आपलं खातं उघडलं.  त्यानंतर पंकज मोहितेने चढाईत १ गुण घेत पुणेरी पलटनला खातं उघडून दिलं. सुरुवातीच्या १० मिनिटात दोन्ही संघांमध्ये अटीतटीची लढत रंगली. सुरुवातीच्या १० मिनिटांचा खेळ झाल्यानंतर पुणेरी पलटनचा संघ १४-१० गुणांनी आघाडीवर होता.

पहिल्या टप्प्यात पिछाडीवर राहिलेल्या दबंग दिल्लीने पुढील १० मिनिटात पुनरागमन करण्यासाठी पूर्ण जोर लावला. १६ व्या मिनिटाला पुणेरी पलटनवर ऑलआऊटचं संकट ओढावलं होतं. १७ व्या मिनिटाला पुणेरी पलटनचा संघ पहिल्यांदा ऑलआऊट झालं यासह १९-१७ सह दबंग दिल्लीने पिछाडी २ गुणांवर आणली. पूर्वार्धातील २० मिनिटांचा खेळ झाल्यानंतर दबंग दिल्लीने २१-२० गुणांसह १ गुणाची आघाडी घेतली.

उत्तरार्धातील दुसऱ्याच मिनिटाला बोनस घेत पुणेरी पलटनने दोन्ही संघांचे गुण २१-२१ ने बरोबरीत आणले. दबंग दिल्लीकडून अजिंक्य पवारने आपलं सुपर १० पूर्ण केलं. सुरुवातीच्या ५ मिनिटांचा खेळ झाल्यानंतर दबंग दिल्लीकडे २८-२३ गुणांसह ५ गुणांची आघाडी होती.

उत्तरार्धातील १० मिनिटांचा झाल्यानंतर दबंग दिल्लीने आपली आघाडी कायम ठेवली. दबंग दिल्लीचा संघ   ३२-२७ ने ५ गुणांनी आघाडीवर होता.

शेवटची ५ मिनिटे शिल्लक असताना दबंग दिल्लीकडे ३४-३१ गुणांसह ३ गुणांची आघाडी होती. शेवटची २ मिनिटे शिल्लक असताना दिल्लीकडे  अवघ्या ३ गुणांची आघाडी होती. ही आघाडी भरून काढण्याचं आव्हान पुणेरी पलटनसमोर होतं. शेवटच्या मिनिटाला पुणेरी पलटनने दिल्लीला ऑलआऊट करत ३८-३८ ने बरोबरी साधली. त्यामुळे सामन्याचा निकल टाय ब्रेकरमध्ये लागला. टाय ब्रेकरमध्ये पुणेरी पलटनने ६-५ ने विजय मिळवला.